# महाराष्ट्र विधानपरिषद

## तिसरे अधिवेशन, २०१७

---

### तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**सोमवार, दिनांक ०७ ऑगस्ट, २०१७ / श्रावण १६, १९३९ ( शके )**

| | |
|---|---|
| **(१) महसूल, मदत व पुनर्वसन, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(२) परिवहन, खारभूमी विकास मंत्री** | |
| **(३) कृषी आणि फलोत्पादन मंत्री** | |
| **(४) सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** | |
| **(५) पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यविकास मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ४३**

---

### कल्याण-माळशेज महामार्गावरील प्रवाशी निवाऱ्यांची दुरवस्था झाल्याबाबत

**(१) * ३१०९९ श्री.जगन्नाथ शिंदे, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-माळशेज मार्ग हा राष्ट्रीय महामार्ग क्र.२२२ च्या अंतर्गत असून अहमदनगर-जुन्नर मार्गे राज्य परिवहन महामंडळाची मोठ्या प्रमाणावर वाहतूक असून कल्याण-माळशेज मार्गावरील महामंडळाच्या ३० प्रवाशी निवाऱ्यांची दुरवस्था झाल्याने निवाऱ्याअभावी प्रवाशांची गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कल्याण-मुरबाड या २२ किमी अंतरावर म्हारळ, वरप, कांबा, रायता, गोवेली, रेवती, बाबसई, कोलम, मामनोली, पोटगाव, धातोली, भूरांडे, भोईरवाडी इ. प्रवाशी निवारे देखभाल, दुरूस्तीअभावी नष्ट होत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर मार्गावरील प्रवाशी निवाऱ्यांची दुरूस्ती करून सुस्थितीत ठेवण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) अंशत: खरे आहे.

कल्याण-माळशेज मार्गावर महामंडळाद्वारे ११ व स्थानिक लोकप्रतिनिधी, स्वराज्य संस्था यांच्याद्वारे ५ असे एकूण १६ प्रवाशी निवारे बांधण्यात आले आहेत. उक्त सर्व प्रवाशी निवाऱ्यांची दुरुस्ती व पुनर्बांधणी आवश्यक आहे.

(२) अंशत: खरे आहे.

रेवती, कोलम, पोटगाव, धानीवलीफाटा, भूरांडे, रायता, मामनोली, हे मार्ग निवारे अस्तित्वात नाहीत.

तसेच, वरप, गोवेली, भोईरवाडी, कांबा, म्हारळ या थांब्यांची देखभाल व दुरुस्ती करणे आवश्यक आहे.

(३) सदर रस्त्यावरील जे प्रवाशी निवारे सध्या अस्तित्वात आहेत. त्यांची दुरुस्ती निधीच्या उपलब्धतेनुसार किंवा स्थानिक लोकप्रतिनिधी यांचेकडून विकास निधी उपलब्ध झाल्यास, त्यातून करण्यात येईल.

तसेच, कांबा, तळवली फाटा, म्हारळ, तांबोर आश्रम येथील प्रवाशी निवाऱ्यांची दुरुस्ती संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेने करावयाची आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात बिगर आदिवासींनी बळकाविलेल्या जमिनी मूळ आदिवासींच्या ताब्यात देण्याबाबत

**(२) * ३१२५४ श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.धनंजय मुंडे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण, ॲड.निरंजन डावखरे, प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आदिवासी भागातील जमिनी बिगर आदिवासीं खरेदी करीत असून गेल्या अडीच वर्षात आदिवासी जमिनी विक्रीसंदर्भात साडेचारशे प्रस्ताव शासनाकडे प्राप्त झाले असून आदिवासी भागातील बिगर आदिवासी खरेदी-विक्रीच्या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी समिती गठीत करण्याचे आश्वासन मा.महसूल मंत्री महोदयांनी सन २०१७ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर समिती गठीत करण्यात आली आहे काय, गठीत करण्यात आलेल्या समितीने चौकशी करुन बिगर आदिवासी जमिनी खरेदी-विक्रीचा अहवाल शासनाला सादर केला आहे काय,

(३) असल्यास, महाराष्ट्र जमीन महसूल संहितेतील तरतूदीप्रमाणे आदिवासी जमिनीवर बिगर आदिवासीचा ताबा असेल किंवा अन्य मार्गाने त्याने ती जमिनी बळकावली असल्यास त्याचा ताबा त्या आदिवासी कुटुंबास मिळवून सातबारावर त्याच्या नावांची नोंद घेण्याबाबतची तरतूद असतांनाही मुंबई उपनगर, ठाणे, पालघर, साक्री (जि.यवतमाळ) तसेच अन्य आदिवासी बहूल जिल्ह्यात बांधकाम व्यावसायिक वा अन्य धनदांडगे यांनी अनेक आदिवासी कुटुंबाच्या जमिनी बळकावल्या असून "महाराष्ट्र जमीन महसूल संहितेमधील" तरतुदीनुसार कार्यवाही करुन ती जमीन त्या आदिवासी कुटुंबियांना परत करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, बांधकाम व्यावसायिक व समाजातील धानदांडग्यांनी आदिवासींच्या बळकावलेल्या जमिनी भाडे तत्वावर घेतली असे कागदोपत्री दाखवून या जमिनीवर फार्म हाऊस किंवा बंगले बांधून सेकंड होम म्हणून या जागेचा वापर करतात व कुठेतरी कोपऱ्यात एखादी छोटीसी खोली आदिवासी करीता बांधून कोणी चौकशीसाठी आलेच तर हा बंगला माझाच आहे असे त्या आदिवासी व्यक्तीस सांगावयास भाग पाडतात, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार समितीच्या अहवाल्याच्या अनुषंगाने बिगर आदिवासी खरेदी-विक्री करणाऱ्यावर कारवाई करून बिगर आदिवासींच्या ताब्यात असलेल्या आदिवासींच्या जमिनी मुळ आदिवासीच्या ताब्यात देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) राज्यातील आदिवासी धारकांचा भोगवटा बिगर आदिवासींना हस्तांतरीत करण्यास परवानगी देण्याबाबतचे सुमारे साडेपाचशे प्रस्ताव शासनाकडे प्राप्त झाले असून, अशा हस्तांतरणाच्या प्रकरणांची चौकशी करण्यासाठी समिती गठीत करण्याबाबतचे आश्वासन मा.मंत्री (महसूल) महोदयांनी सन २०१७ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात दिले असल्याचे आढळून आले नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या कलम-३६(३) खालील परंतुकामध्ये तसेच महाराष्ट्र अनुसूचित जमातींना जमिनी प्रत्यार्पित करण्यासाठी अधिनियम, १९७४ मध्ये बिगर आदिवासींच्या ताब्यातील अनुसूचित जमातीतील व्यक्तींच्या मालकीच्या जमिनी, प्रत्यार्पित करण्यासंदर्भात तरतूद असून, याबाबतची कार्यवाही करण्यास जिल्हाधिकारी सक्षम आहेत. सदर तरतुदींच्या अनुषंगाने क्षेत्रिय स्तरावर प्रकरणपरत्वे कार्यवाही सुरु आहे.

(४) अशा बाबी निदर्शनास आल्या नाहीत.

(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## माझगाव (मुंबई) येथील शासकीय भूखंड बेकायदेशीररित्या विक्री केल्याबाबत

**(३) * ३३३८२ श्री.जयंत पाटील, श्री.रविंद्र फाटक :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माझगाव येथील शासकीय भूखंड कच्छी लोहाना निवास गृह ट्रस्टला भाडेपट्टयाने शासनाने शर्ती व अटी घालून मंजूर केलेला आहे, सदरहू शासकीय भूखंडाचा भाडेपट्टा संपलेला असतानाही कच्छी लोहाना निवास गृह ट्रस्टने सुमारे ४ हजार ५८१ चौ.मी. भूखंड मे.गोल्ड प्लाझा डेव्हलपर्स या विकासकाला बेकायदेशीररित्या शासनाची कोणतीही पूर्व परवानगी न घेता विकला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू बेकायदेशीर प्रकाराबाबत जयेश कोटक व अन्य यांनी अनेक वर्षापासून मा.महसूल मंत्री, प्रधान सचिव, महसूल व वन विभाग तसेच जिल्हाधिकारी, मुंबई आदीकडे तक्रारी केल्यानंतर या भूखंडावर कुठल्याही स्वरूपाचा विकास करण्यास वा हस्तांतरणास मज्जाव केला होता व याबाबत पालिका आयुक्त तसेच उपनिबंधक यांनाही कळविण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मे.गोल्ड प्लाझा डेव्हलपर्सने याविरूध्द महाराष्ट्र महसूल प्राधिकरणाकडे केलेले अपीलही फेटाळण्यात आल्याने तत्कालीन जिल्हाधिकारी, मुंबई यांनी पुन्हा सविस्तर अहवाल प्रधान सचिव, महसूल विभाग यांना सादर केला आहे तसेच मे.गोल्ड प्लाझा डेव्हलपर्सना दिलेला संपूर्ण ४ हजार ५५१ चौमीटर भूखंड हा शासकीय असल्याचा दावा करीत जयेश कोटक यांनी प्रधान सचिव, महसूल यांचेकडे माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान कागदपत्रे सादर केली आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाकडून योग्य दखल घेण्यात येत नसल्यामुळे तसेच सदरहू शासकीय भूखंडाबाबत निर्णय घेण्यास विलंब होत असल्याने जयेश कोटक यांनी पंतप्रधान कार्यालयाकडे तक्रार केली असता पंतप्रधान कार्यालयाने राज्याच्या मुख्य सचिवांना पत्र पाठवून अहवालही मागविलेला असता त्याची महसूल विभागाने दखल घेतलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) माझगांव येथील नवीन सर्व्हे नं. २/३६०५ मधील शासकीय जमीन (३९९२.५ चौ.मी.) भाडेपट्टाकराराने दिनांक १/९/१९०३ पासून दि वुमेन्स फॉरेन मिशनरी सोसायटी ऑफ दि मेथॉडीस्ट ऑपिस्कोपल चर्च यांना ९९ वर्षांकरीता भाडेपट्टयाने देण्यात आलेली होती. सदर जमीन दिनांक २३/८/१९१८ रोजी दि वुमेन्स फॉरेन मिशनरी सोसायटी ऑफ दि मेथॉडीस्ट ऑपिस्कोपल चर्च यांनी श्री.कच्छी लोहाना निवास गृह ट्रस्ट यांना भाडेकरारादवारे (Deed of Assignment) दिली. त्याच दिवशी एका स्वतंत्र खरेदीखतादवारे उक्त सोसायटीने नवीन सर्व्हे क्र. १/३६०५ व ३/३६०५ हे भूखंड

देखील श्री.कच्छी लोहाना निवास गृह ट्रस्ट यांना विकले. नगर भूमापनाच्यावेळी उक्त नवीन सर्व्हे क्र. २/३६०५ याचे सर्व्हे क्र. १/३६०५ व ३/३६०५ यांच्यासह रुपांतरण भूकर क्र. १२६ मध्ये झाले व श्री. कच्छी लोहाना निवास गृह ट्रस्ट यांनी सदर भूकर क्र. १२६ मे. गोल्ड प्लाझा डेव्हलपर्स यांना दिनांक २४/५/२०१० च्या खरेदी खताने विकल्याचे निदर्शनास आलेले आहे. त्यावेळी मुळ सर्व्हे नं. २/३६०५ याची भाडेपट्टयाची मुदत संपलेली होती.

(२) होय.

तत्कालिन मा.मंत्री (महसूल) यांच्या दिनांक १८/७/२०१४ च्या आदेशान्वये सदर भुखंडावरील हस्तांतरणाच्या नोंदी मिळकत पत्रिकेवर घेण्यास स्थगिती देण्यात आलेली आहे.

(३) होय.

सदर प्रकरणी श्री.जयेश कोटक यांना मा.प्रधान सचिव, महसूल तसेच जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांचेकडे वेळोवेळी सुनावणी देण्यात आलेली आहे.

(४) सदर तक्रारीच्या अनुषंगाने उपलब्ध कागदपत्रांच्या आधारे निर्णय घेण्याबाबत कार्यवाही चालू आहे.

(५) व (६) जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांचे कार्यालयाकडून श्री.कच्छी लोहाना निवास गृह ट्रस्ट व मे.गोल्ड प्लाझा डेव्हलपर्स यांचेविरुध्द भायखळा पोलीस ठाणे येथे एफ.आय.आर. क्र. २३२/२०१६, दिनांक १६/८/२०१६ अन्वये गुन्हा नोंद केलेला आहे.

-----------------

## शिंदखेडा (जि.धुळे) तालुक्यात ७/१२ उताऱ्यांच्या ऑनलाईन नोंदी खाजगी व्यक्तींकडून करण्यात येत असल्याबाबत

**(४) * ३४२१७ श्रीमती स्मिता वाघ :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात संगणकीय ७/१२ उताऱ्याचे काम सुरु असून शिंदखेडा (जि.धुळे) तालुक्यात ७/१२ उतारा संगणकीय झाले असून ऑनलाईन नोंदीची कामे तलाठी मंडळ अधिकारी यांच्यास्तरावर सुरू आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ऑनलाईन नोंदी घेत असतांना चुकीच्या नोंदी झाल्यामुळे शेतकरी त्रस्त झाले असून यासंदर्भात तलाठी यांच्याकडे नोंदी दुरुस्त करण्याबाबत विनंती केली असता नोंदीचे काम ऑपरेटरला दिले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर ऑनलाईन नोंदी करण्याची जबाबदारी तलाठी व मंडळ अधिकारी यांची असताना तलाठी व मंडळ अधिकारी खाजगी व्यक्तींकडून ऑनलाईन नोंदी करून घेत असल्यामुळे जबाबदारी नसलेल्या खाजगी व्यक्तीकडून शासकीय दस्तऐवज नष्ट होण्याची भिती निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय, हे खरे आहे.

(२) अशी बाब निदर्शनास आली नाही.

(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## माथेरान (ता.कर्जत, जि.रायगड) येथे रिक्षा वाहतूकीस परवानगी मिळणेबाबत

**(५) * ३२६४८ प्रा.जोगेन्द्र कवाडे : तारांकित प्रश्न क्रमांक २९४९६ ला दिनांक ३१ मार्च, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माथेरान (ता.कर्जत, जि.रायगड) येथे ई-रिक्षा/सीएनजी रिक्षा किंवा बॅटरीवर चालणारी रिक्षा याद्वारे वाहतूक करण्यास परवानगी मिळणेबाबतचा प्रस्ताव केंद्रीय पर्यावरण व वने मंत्रालयाच्या दिनांक ४ फेब्रुवारी, २००३ च्या अधिसूचनेन्वये गठीत संनियंत्रण समितीच्या अभिप्रायासह शासनास फेरसादर करण्याचे जिल्हाधिकारी, रायगड यांना सूचित करण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केंद्रीय पर्यावरण व वने मंत्रालयाच्या गठीत संनियंत्रण समितीने या प्रस्तावावर आपले अभिप्राय दिले असून अभिप्राय दिल्यानंतरही जिल्हाधिकारी, रायगड यांना फेरप्रस्ताव शासनास सादर करण्यास विलंब लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२), (३) व (४) महसूल विभागाच्या सन १९५९ च्या शासन निर्णयान्वये माथेरान या पर्यटन स्थळासाठी विहित नियमावली नुसार माथेरान येथे मोटारगाडी, सायकल, तीनचाकी गाडी इत्यादी कोणत्याही प्रकारची वाहने वापरण्यास बंदी घालण्यात आली आहे. तद्नंतर केंद्र शासनाच्या पर्यावरण व वन मंत्रालयाच्या दिनांक ०४/०२/२००३ च्या अधिसूचनेन्वये माथेरानचा पर्यावरणीयदृष्टया संवेदनशील क्षेत्रामध्ये समावेश करण्यात आला असून रुग्णवाहिका तसेच अग्निशमनदलाच्या वाहन तसेच घनकचरा वाहतुकीसाठी वापरल्या जाणाऱ्या वाहनाव्यतिरिक्त इतर कोणत्याही वाहनास माथेरान नगर परिषदेच्या हद्दीत मज्जाव करण्यात आला आहे.

माथेरान येथे ई-रिक्षा/सीएनजी रिक्षा किंवा बॅटरीवर चालणारी रिक्षा याने वाहतूक करण्यास परवानगी मिळणेबाबतचा प्रस्ताव विभागीय आयुक्त, कोकण यांचेमार्फत शासनास प्राप्त झाला आहे. तथापि, सदर प्रस्ताव केंद्रीय पर्यावरण व वने मंत्रालयाच्या दिनांक ०४/०२/२००३ च्या अधिसुचनेन्वये गठीत संनियंत्रण समितीच्या अभिप्रायासह शासनास फेरसादर करण्याचे जिल्हाधिकारी, रायगड यांना सूचित करण्यात आले असून सदर समितीचे ई-रिक्षाबाबतचे अंतिम अभिप्राय अद्याप प्राप्त झालेले नाहीत.

-----------------

## विरार (जि.पालघर) येथील शासकीय शर्तीच्या जमिनीवर स्वतःची मालकी दाखवून शासनाचा महसूल बुडविल्याबाबत

**(६) * ३३८१० श्री.रविंद्र फाटक :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विरार (जि.पालघर) येथील सर्वे क्र. ३३८ अ-२ क्षेत्र ८-७८.७ या ७/१२ उताऱ्यावर बिस्तीर बारक्यास गुजरात रुळीप्रमाणे दिलेली असल्याच्या उल्लेख असतानाही २७ एकर शासकीय शर्तीच्या जमिनीवर स्वतःची मालकी दाखवून शासनाचा रुपये २०० कोटी पेक्षा जास्त महसूल बुडविल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर जमिनीवरील बिगरशेती परवानगी रद्द करून मूळ नोंद करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२) व (३) मौजे विरार, तालुका वसई येथील स.नं. ३३८/अ/२ या जमिनीच्या सन १९५३-५४ च्या गा.न.नं. ७/१२ च्या इतर हक्क सदरी "बिस्तीर बारक्यास गुजराथ रुळीप्रमाणे दिलेली जमीन आहे" अशी नोंद आहे. सदरची नोंद कोणत्या फेरफाराने दाखल झाली याबाबतचा अभिलेख उपलब्ध होत नाही. ही पोकळीस्त नोंद कमी करण्यासाठी फेरफार क्र.८३९६ हा प्रस्तावित करण्यात आला होता. परंतू तत्कालीन मंडळ अधिकारी यांनी दिनांक १५/१२/१९८७ च्या शे-यान्वये हा फेरफार नामंजूर करुन सदर नोंद तशीच ठेवण्यात आली आहे.

श्री.मॅथ्यू रॉड्रीग्ज व श्री.विकास भास्कर वर्तक स्वत: व इतर यांचे कुळमुखत्यारी यांना जिल्हाधिकारी, ठाणे यांचे आदेश दिनांक ०१/०६/२००४ अन्वये बिनशेती परवानगी देण्यात आलेली आहे. त्यामध्ये स.नं. ३३८/अ/२ क्षेत्र ८-७८.७ हे.आर. या श्री.सुदाम बिस्तीर पाटील यांच्या जमिनीचा समावेश आहे.

उपरोक्त स.नं.३३८/अ/२ याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ०५/०३/२०१६ अन्वये जिल्हाधिकारी, पालघर यांचेकडे तक्रार केली होती. सदर तक्रारीच्या अनुषंगाने उपविभागीय अधिकारी, वसई यांनी त्यांचा अहवाल दिनांक १४/०९/२०१६ रोजी सादर केला होता. प्रस्तुत प्रकरणी अंतिम निर्णय घेण्याच्यादृष्टिने महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ मधील कलम २०(२) अन्वये चौकशी करण्यास अपर जिल्हाधिकारी, पालघर यांना प्राधिकृत करण्यात आले असून पुराव्याच्या आधारे गुणवत्तेवर निर्णय घेण्याचे संकल्पित आहे.

-----------------

## राजापूर (जि.रत्नागिरी) तालुक्यातील आंबा उत्पादक शेतकऱ्यांना अनुदानापासून वंचित ठेवल्याबाबत

**(७) * ३२७३२ श्रीमती हुस्नबानू खलिफे :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजापूर (जि.रत्नागिरी) तालुक्याला सन २०१५-१६ मध्ये लहरी हवामानाचा फटका बसल्याने नुकसान झालेल्या आंबा पिकांच्या नुकसान भरपाईपोटी शासनाकडून रूपये १२ कोटी अनुदान प्राप्त झाले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाच्या योग्य नियोजन अभावी वाटप न झालेली रूपये ७ कोटी ८८ लाख ९९ हजार ७५९ इतकी रक्कम मार्च अखेर दुस-यांदा शासनाला परत करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने अनुदानापासून आंबा उत्पादक शेतकऱ्यांना वंचित ठेवणाचा संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) अंशत: खरे आहे.

बाधित शेतकऱ्यांना वेळोवेळी सूचित करुन व पुरेशी संधी देऊनही ज्या शेतकऱ्यांनी देय नुकसान भरपाईची रक्कम स्विकारलेली नाही. तसेच आवश्यक कागदपत्रे सादर केलेली नाही, त्यांची नुकसान भरपाईची रक्कम व बाधित क्षेत्रापेक्षा जास्त क्षेत्राचे अतिरिक्त अनुदान समर्पित केले आहे. तसेच ५०% पेक्षा जास्त आंबा व काजू फळझाडांचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना तहसिल कार्यालयामार्फत नुकसान भरपाई देण्यात आलेली आहे. आंबा उत्पादक शेतकऱ्यांना अनुदानापासून वंचित ठेवलेले नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## लोणंद (ता.जि.सातारा) बसस्थानकाची दुरवस्था झाल्याबाबत

**(८) * ३४२०४ श्री.आनंदराव पाटील :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लोणंद (ता.जि.सातारा) या राज्य परिवहन महामंडळाच्या बसस्थानकाची सोयी-सुविधेअभावी दुरवस्था झाली असल्यामुळे प्रवाशांची गैरसोय होत असल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) व (२) लोणंद बसस्थानक सुस्थितीत असून, बसस्थानकावर ६ फलाटे, वाहतूक नियंत्रण/चौकशी कक्ष, प्रतिक्षालय, आरक्षण, पिण्याचे पाणी, लाईट-पंखे, प्रसाधनगृह, आसन व्यवस्था इ. सोयी सुविधा उपलब्ध आहेत. तसेच, बसस्थानकाची व प्रसाधनगृहाची नियमित स्वच्छता करण्यात येत असून, प्रवाशांची कोणत्याही प्रकारची गैरसोय झालेली नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कल्याण (जि.ठाणे) तालुक्यातील नेवाळी विमानतळासाठी शेतकऱ्यांच्या जमिनी जबरदस्तीने संपादित केल्याबाबत

**(९) * ३४३७९ श्री.अनिल भोसले, श्री.नरेंद्र पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक १४७४६ ला दिनांक २१ मार्च, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण (जि.ठाणे) तालुक्यातील नेवाळी विमानतळासाठी संरक्षण विभागाने स्थानिक शेतकऱ्यांच्या जमिनी जबरदस्तीने संपादीत केल्यामुळे सदर शेतकऱ्यांनी दिनांक २२ जून, २०१७ रोजी वा त्यासुमारास आंदोलन केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नूसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे अंशतः खरे आहे.

संघर्ष समितीचे लोक व स्थानिक शेतकऱ्यांनी दिनांक २२/६/२०१७ रोजी सकाळी ९.०० वाजेच्या सुमारास डावलपाडा येथे रास्ता रोको/आंदोलन करण्यात आले होते.

(२) सन १९४२ साली जिल्हाधिकारी, ठाणे यांनी कल्याण तसेच अंबरनाथ परिसरातील नेवाळी आणि इतर १४ गावामधील जमिनी Defence of India Act & rules १९३९ चे नियम ७५ (A) (१) अन्वये अधिग्रहीत (Requisition) करण्यात आलेल्या आहेत.

अधिग्रहीत केलेल्या जमिनीपैकी सन १९४३ चे सुमारास जिल्हाधिकारी, ठाणे यांनी Defence of India Act rules १९३९ चे नियम ७५ (A) मधील तरतुदीनुसार कल्याण आणि अंबरनाथ तालुक्यातील १५ गावांमधील सुमारे १६७३ एकर जमीन संपादीत (acquisition) करण्यात आली आहे. तद्नंतर सन १९५४ ते १९५७ चे सुमारास संपादित जमिनीच्या ७/१२ वर नेवाळी एरोड्रम, नेवाळी एअरपोर्ट इत्यादी प्रकारच्या नोंदी घेण्यात आलेल्या आहेत. संपादित जागेची मोजणी सन २०१५ मध्ये पूर्ण झालेली असून उक्त जमिनी संरक्षित करण्यासाठी नौदलाकडून संरक्षण भिंतीचे काम सुरु करण्यात आलेले आहे.

विषयांकित जमिनीच्या अनुषंगाने संबंधित ग्रामस्थांनी मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट याचिका क्र. ३४४६/२०१७ ते ३४६२/२०१७ दाखल असून याबाबत उपविभागीय अधिकारी, कल्याण/उल्हासनगर यांनी प्रतिज्ञापत्र मा.उच्च न्यायालयात दाखल केलेले आहे. मा.न्यायालयाने कोणतेही आदेश अद्यापपर्यंत पारित केलेले नाहीत. सद्यस्थितीत सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कोल्हापूरसह राज्यात ट्रेलरर्सना हायड्रोलीक ब्रेकींग सिस्टम बसविण्याची सक्ती केल्याबाबत

**(१०) * ३११२६ श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूरसह राज्यात शासनाने ट्रेलरर्सना हायड्रोलीक ब्रेकींग सिस्टम बसवणे सक्तीचे करुन त्याची अंमलबजावणी केल्याने तसेच मागील ६ महिन्यांपासून पासिंगचे काम रखडल्यामुळे ट्रेलरचे काम करणारे कारागीर आर्थिक अडचणीत आले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ट्रॅक्टरला त्याच पध्दतीच्या ब्रेकसाठी पॉईन्टस नसल्यामुळे हायड्रोलीक ब्रेकींग सिस्टम बसवणे शक्य नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन ट्रेलरर्सना हायड्रोलीक ब्रेकींग सिस्टीम बसविण्याची सक्ती रद्द करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) केंद्र शासनाने दिनांक ०१/०४/२००९ नंतर उत्पादीत होणाऱ्या ॲग्रीक्लचर ट्रेलरर्सना हायड्रोलीक ब्रेकींग सिस्टम असणे अनिवार्य केले आहे. त्याच्या अंमलबजावणीस केंद्र शासनाने वेळोवेळी मुदतवाढ दिली. तथापि दिनांक ०१/०१/२०१७ नंतर मुदतवाढ न दिल्यामुळे सदर तरतुदीची सध्या अंमलबजावणी सुरू आहे.

(२) ट्रेलरला बसविलेले हायड्रोलीक ब्रेकिंग सिस्टीम वापरात आण्यासाठी ट्रॅक्टरला पॉईंट असणे आवश्यक आहे.
(३) सदर नियमाच्या अंमलबजावणीस मुदतवाढ देण्यासाठी व ट्रॅक्टर उत्पादकास तशा सुचना देण्यासाठी केंद्र शासनास विनंती करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईसह राज्यातील खाजगी बसेसकडून परिवहन विभागाकडे होणाऱ्या करभरणा प्रक्रियेत गैरव्यवहार झाल्याबाबत

**(११) * ३४४१० आर्कि.अनंत गाडगीळ :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईसह राज्यातील शेकडो खाजगी बसेसकडून परिवहन विभागाकडे होणाऱ्या करभरणा प्रक्रियेत गैरव्यवहार झाल्याचे दिनांक ३ जुलै, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, डिजिटल कॅशलेस व्यवहारांना शासन चालना देत असताना परिवहन विभागाकडे करभरणा करताना संगणकावर नोंदीच्या ई-ऑडिटचा अभाव असून खाजगी बस वाहतूकदारांना मोठ्या प्रमाणात व्यावसायिक कर भरावा लागतो मात्र मुंबईसह राज्यातील प्रादेशिक परिवहन कार्यालयामध्ये अजूनही रोख रक्कमेचा भरणा करावा लागत असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रादेशिक परिवहन कार्यालयामध्ये बस चालकांना कर भरताना तीन स्लिप भराव्या लागत असून त्यातील दुसऱ्या व तिसऱ्या स्लिप ही कार्बन कॉपी असते. परंतु अनेकदा करांतील सुरुवातीचे आकडे प्रत्यक्ष नोंदी येत नसल्याचा आरोप बसचालकांच्या संघटनेने केला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) दिनांक ०४/०७/२०१७ रोजी वृत्तपत्रात बातमी प्रसिध्द झाली होती.

(२) परिवहन विभागाने एकूण ५० कार्यालयांपैकी ४६ कार्यालयांमध्ये "वाहन ४.०" आणि ३९ कार्यालयांमध्ये "सारथी ४.०" संगणक प्रणाली सुरु केली आहे. उर्वरित कार्यालयामध्ये संगणक प्रणाली सुरु करण्याचे काम प्रगती पथावर आहे. डिजीटल कॅशलेस व्यवहारांना चालना मिळण्यासाठी संगणकीय प्रणालीचे ई-ऑडिट करण्याच्या सूचनांबाबत परिपत्रक निर्गमित केले आहे. प्रादेशिक परिवहन कार्यालय, औरंगाबाद येथे परिवहन संवर्गातील वाहनांचा ऑनलाईन कर भरणा कार्यपध्दतीची चाचणी घेण्यात येत असून, सदर कामकाज अंतिम टप्प्यावर आहे. तसेच, सद्य:स्थितीत व्यवसाय कर भरणा रोख स्वरुपात स्विकारण्यात येतो.

(३) हे खरे नाही.

(४) वर्तमान पत्रात प्रसिध्द झालेल्या बातमीच्या अनुषंगाने मुंबई बस मालक संघटनेने केलेल्या आरोप मोघम स्वरुपाचे असून, त्यांचेकडून कोणत्याही विवक्षित स्वरुपाची नेमकी माहिती प्राप्त न झाल्यामुळे कारवाई करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## द्राक्ष बागांचे नुकसान टाळण्यासाठी प्लास्टिक आच्छादन या घटकाचा समावेश एकात्मिक फलोत्पादन विकास अभियानांतर्गत करण्याबाबत

**(१२) * ३१२५९ डॉ.अपूर्व हिरे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.अमरसिंह पंडित, श्री.धनंजय मुंडे, श्री.नरेंद्र पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक २७८४७ ला दिनांक ३१ मार्च, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **फलोत्पादन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नैसर्गिक आपत्तीमुळे होणारे द्राक्ष बागांचे नुकसान टाळण्यासाठी प्लास्टिक आच्छादन या घटकाचा समावेश करण्यासाठी एकात्मिक फलोत्पादन विकास अभियानांतर्गत केंद्र शासनाच्या कृषी, सहकार व शेतकरी कल्याण विभागास सादर करण्यात आलेल्या प्रस्तावास केंद्र शासनाकडून मान्यता प्राप्त झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त योजनेची अंमलबजावणी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, याबाबत राज्य शासन तसेच महाराष्ट्र फलोत्पादन आणि औषधी वनस्पती मंडळ, पुणे यांच्यास्तरावरून केंद्र शासनाकडे कोणता पाठपुरावा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३), (४) व (५) याबाबत केंद्र शासनाच्या कृषी, सहकार व शेतकरी कल्याण विभागास, उपसचिव स्तरावरुन दिनांक १८/०७/२०१६, २२/११/२०१६, रोजी व प्रधान सचिव (कृषी) यांचे स्तरावरुन दिनांक १३/०१/२०१७, १७/०३/२०१७ व २१/०७/२०१७ रोजी पत्र पाठवून पाठपुरावा करण्यात आला आहे. महाराष्ट्र राज्य फलोत्पादन आणि औषधी वनस्पती मंडळ, पुणे यांच्या स्तरावरून देखील दिनांक ०३/१२/२०१६ व २४/०७/२०१७ च्या पत्रान्वये, केंद्र शासनाकडे पाठपुरावा करण्यात आला आहे. तसेच यशदा, पुणे येथे केंद्र शासनाचे सहसचिव (फलोत्पादन) यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २७/०१/२०१७ रोजी झालेल्या बैठकीत एकात्मिक फलोत्पादन विकास अभियानांतर्गत प्लास्टिक आच्छादन या घटकाचा समावेश करण्याबाबत शिफारस करण्यात आली आहे.

-----------------

## जुन्नर-तांबे-बांबळेवाडी बससेवा सुरू करण्याबाबत

**(१३) * ३३३१० श्री.परिणय फुके :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जुन्नर (जि.पुणे) तालुक्यातील मु.बांबळेवाडी (पो.तांबे) ते जुन्नर अशी बस सेवा शासनाने मंजूर केलेली असतांना अद्‌याप बांबळेवाडी ते जुन्नर बस सेवा सुरू झाली नसल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बांबळेवाडी हे वाहतुकीसाठी मुख्य मार्गावर असून आसपासच्या डोंगराळ अतिदुर्गम भागातील आदिवासी यांना बांबळेवाडी येथून प्रवास करणे सोईचे असल्याने तसेच, बांबळेवाडी ते तांबे हे अंतर फार मोठे असल्यामुळे जुन्नर-तांबे ऐवजी जुन्नर-तांबे-बांबळेवाडी अशी बससेवा सुरू करण्याबाबतची मागणी ग्रामस्थानी शासनाकडे केली असल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार जुन्नर-तांबे-बांबळेवाडी अशी बससेवा सुरू करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१), (२) व (३) राज्य परिवहन महामंडळाद्वारे जुन्नर-तांबे अशा १६ फेऱ्या चालनात असून तांबे-बांबळेवाडी हा रस्ता नवीन बनविण्यात आला असून, सदर मार्गावर बसफेऱ्या सुरु करण्यासाठी मार्ग वाहतूकीस योग्य असल्याबाबतची खातरजमा महामंडळाद्वारे करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## आरे (गोरेगाव) कॉलनीतील शासकीय निवासस्थाने रिक्त असल्याबाबत

**(१४) * ३४४६२ श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.सुनिल तटकरे, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.आनंद ठाकूर :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र राज्य दुग्ध विकास महामंडळाच्या अखत्यारित असलेल्या आरे (गोरेगाव) कॉलनीतील शासकीय निवासस्थानाच्या १८० खोल्यांपैकी १४० खोल्या गत दोन वर्षापासून रिक्त आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासकीय कर्मचाऱ्यांना गरज असतांना निवासाविना वंचित रहावे लागत असून शासनाचा महसूल बुडत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर :** (१) हे खरे नाही.

आरे कॉलनीत एकूण १७७९ शासकीय निवासस्थाने असून २४० निवासस्थाने रिक्त आहेत.

(२) हे खरे नाही.

महाराष्ट्र राज्य दुग्धविकास विभागांतर्गत कार्यरत अधिकारी/कर्मचारी यांच्या मे, २०१७ अखेरच्या निवासस्थानाच्या सर्व मागण्यानुसार निवासस्थाने वाटप केलेली आहेत. आजमितीस निवासस्थान मागणी संदर्भातील कोणताही अर्ज प्रलंबित नाही, शासनाच्या अन्य विभागातील अधिकारी/कर्मचारी यांचे निवासस्थान मागणीचे ३४ अर्ज प्राप्त असून त्यांच्या पात्रता तपासून त्यांना निवासस्थान वाटपाबाबत निवासस्थान वाटप समितीच्या बैठकीत निर्णय घेण्यात येणार आहे .

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## ठाणे व पालघर जिल्ह्यातील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी केलेला गैरव्यवहार

**(१५) * ३१७३२ श्री.धनंजय मुंडे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण, ॲड.निरंजन डावखरे : तारांकित प्रश्न क्रमांक २७०८६ ला दिनांक १७ मार्च, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मे.जिजाऊ कंस्ट्रक्शन या कंपनीने पालघर जिल्ह्यातील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांशी व ठाणे येथील अधिक्षक अभियंता यांच्याशी संगनमत करुन रूपये ७० कोटींची गैरव्यवहार केला असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोने-अघई (ता.वाडा, जि.पालघर) या राजमार्गाचा साडे आठ कि.मी. च्या टप्प्यासाठी तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाने तयार केलेल्या रुपये ९ कोटी ७९ लाख रुपयांच्या अंदाजपत्रकाच्या २५ टक्के अधिक दराने मे.जिजाऊ कंस्ट्रक्शन या कंपनीला काम दिल्याने शासनाचे रुपये ४ कोटी ७८ लाखांचे नुकसान झाल्याचे दिनांक १३ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कुडुस-कंचाड, सापरोंडे-उचाट, कुडुस-कोंडले या रस्त्यांचे अंदाजपत्रकही जास्त रकमेचे करुन निकृष्ट दर्जाची कामे केल्यामुळे उक्त चारही प्रकरणी एसआयटी मार्फत चौकशी करण्यात यावी अशी लेखी मागणी श्रमजीवी संघटनेचे संस्थापक यांनी मा.मुख्यमंत्री यांचेकडे केली आहे, तर सदर गैरव्यवहार प्रकरणी जिल्हाधिकारी यांनी विशेष पथकामार्फत (एसआयटी) तपासणी करुन दोषींवर फौजदारी कारवाई करण्याबाबतचा अहवाल शासनास सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी अहवालाच्या अनुषंगाने सदर कंपनीच्या मालकासह संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील** : (१) व (२) प्रस्तुत प्रश्नातील नमूद बाबींच्या संदर्भात मुख्य अभियंता, सा.बां.प्रा.वि., मुंबई यांनी चौकशी केली आहे. या चौकशीत या कामाबाबत कोणतीही प्रतिकुल बाब आढळून आली नाही.

(३) अशी बाब नाही.

तथापि, श्रमजीवी संघटनेचे निवेदन प्राप्त आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील मुजोर रिक्षा/टॅक्सी चालकांवर कारवाई करण्याबाबत

**(१६) * ३१५९२ श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर : तारांकित प्रश्न क्रमांक २७७९४ ला दिनांक ७ एप्रिल, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील रिक्षा किंवा टॅक्सी चालकांकडून प्रवाशांना इच्छित स्थळी जाण्यास नकार देणे, अरेरावी करणे तसेच मारहाणी करणे याबाबतची घटना प्रवाशांसोबत घडत असून मागील पाच वर्षात अशा मुजोर रिक्षा/टॅक्सी चालकांविरोधात मुंबईतील ताडदेव, अंधेरी व वडाळा या तीन प्रादेशिक परिवहन कार्यालयात १५ हजार तक्रारी नोंद झाल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अशा मुजोर रिक्षा/टॅक्सी चालकांविरोधात प्रादेशिक परिवहन कार्यालयाद्वारे सुरू करण्यात आलेल्या टोल फ्री क्रमांकावरून तक्रार करतांना किचकट प्रक्रियेतून जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार मुजोर रिक्षा/टॅक्सी चालकांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) मुजोर रिक्षा/टॅक्सी चालकांवर अनुज्ञप्ती निलंबन तसेच दंडात्मक वसुली करण्यात आलेली आहे. सन-२०११ ते सन-२०१७ या कालावधीत एकूण १५,७४६ प्राप्त तक्रारींपैकी ८,७१९ तक्रारी निकाली काढण्यात आलेल्या आहेत. ६,८९५ चालकांची अनुज्ञप्ती निलंबित करून रुपये १,२१,१९,४८०/- दंड वसुल करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अंजनेरी (ता.त्र्यंबकेश्वर, जि.नाशिक) येथील ट्रेकिंग सेंटरचे काम करण्याबाबत

**(१७) * ३१८६७ श्री.जयवंतराव जाधव, श्री.धनंजय मुंडे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.अमरसिंह पंडित :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंजनेरी (ता.त्र्यंबकेश्वर, जि.नाशिक) येथील ट्रेकिंग सेंटरचे काम मागील तीन वर्षांपासून प्रलंबित असल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने ट्रेकिंग सेंटर कार्यान्वित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे अंशत: खरे आहे.

अंजनेरी (ता.त्र्यंबकेश्वर, जि.नाशिक) येथील ट्रेकिंग सेंटर बांधकामाचे काम पूर्ण करण्यात आले असून विद्युतीकरणाचे काम प्रगतीत आहे.

(२) व (३) ट्रेकिंग सेंटरचे काम संबंधित ठेकेदाराने विहित कालमर्यादेत पूर्ण केले नसल्याने ठेकेदारावर दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे. प्रस्तुत इमारत विद्युतीकरणासह पूर्ण करून माहे ऑगस्ट, २०१७ अखेर कार्यान्वित करण्याबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.

----------------

## पुसद (जि.यवतमाळ) तालुक्यातील महा-ई-सेवा केंद्रामध्ये दाखले देण्यासाठी अधिकचे दर आकारले जात असल्याबाबत

**(१८) * ३४११५ श्री.हरिसिंग राठोड, श्री.सुभाष झांबड, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुसद (जि.यवतमाळ) तालुक्यातील महा-ई-सेवा केंद्रामध्ये दाखले देण्यासाठी शासकीय दरापेक्षा अधिकच्या तिप्पट ते चौपट दर आकारले जात असल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर तालुक्यात विविध प्रमाणपत्र काढण्यासाठी तहसिल कार्यालयामध्ये रूपये १०० चा मुद्रांकाचे अतिरिक्त रूपये २० ते ३० आकारून शेतकरी व विद्यार्थ्यांची लूट होत असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार अधिक दर आकारणाऱ्या दोषीं अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) अशी बाब निदर्शनास आली नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## आष्टी (जि.बीड) शहरातून जाणाऱ्या अहमदनगर-बीड रस्त्यांची दुरूस्ती करण्याबाबत

**(१९) * ३३२२० श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आष्टी (जि.बीड) शहरातून जाणाऱ्या अहमदनगर-बीड या रस्त्याची वर्षभरात दोनदा दुरूस्ती होवुनही रस्त्यात खड्डे पडून रस्त्याची दुरवस्था झाली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अहमदनगर-बीड हा रस्ता सुधारणेसाठी सन २०१५-२०१६ व सन २०१६-२०१७ या आर्थिक वर्षात दिनांक १५ जून, २०१७ अखेर किती निधी खर्च करण्यात आलेला आहे,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार सदर रस्त्याची दुरूस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही. प्रश्नांकित रस्त्याच्या डांबरी पृष्ठभागावरील खड्डे भरण्याची कामे करून रस्ता वाहतुकीसाठी सुस्थितीत ठेवण्यात आला आहे.

(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## परभणी शहरातील शासकीय जमिनींचे बेकायदेशीर हस्तांतर झाल्याबाबत

**(२०) * ३३८९१ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी : तारांकित प्रश्न क्रमांक २७९०६ ला दिनांक ३१ मार्च, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी शहरातील मध्यवस्तीत असणाऱ्या सर्व्हे नं. ३१५ ते ३३० मधील जवळपास ७५ एकर शासकीय जमिनी बेकायदेशीररित्या हस्तांतरीत झाल्यावरून मा.उच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे याचिकाकर्त्यांना आपले म्हणणे मांडण्याची संधी देण्याबाबतचे आदेश जिल्हाधिकारी, परभणी यांना माहे फेब्रुवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान देण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हाधिकारी, परभणी यांनी याचिकाकर्त्याचे म्हणणे मांडण्याची संधी तसेच सुनावणीची प्रक्रिया पुर्ण केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदरील अतिक्रमण हटवून शासकीय जागा ताब्यात घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) परभणी शहरातील स. नं. ३१५ ते ३१७, ३२५ ते ३२७, आणि ३३० मधील जमिनीच्या गा. न. नं. ७/१२ मध्ये भोगवटादार सदरी 'महाराष्ट्र शासन-बलदीया सरकार' अशी नोंद घेण्याबाबत आणि स. नं. ३१८ ते ३२४, ३२८ व ३२९ या जमिनीवरील खाजगी व्यक्तींची नावे कमी करून 'महाराष्ट्र शासन-महसूल विभाग' अशी नोंद घेण्याबाबत जिल्हाधिकारी, परभणी यांनी दिनांक २२/०१/२०१६ रोजी आदेश पारीत केले होते.

सदर आदेशाच्या विरोधात पटेल कत्रुवार ॲण्ड कंपनी यांनी मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ येथे रिट याचिका क्र.१३३८/२०१६ अन्वये प्रकरण दाखल केले होते. उक्त रिट याचिकेमध्ये याचिकाकर्त्यास म्हणणे सादर करण्याची पुरेशी संधी देऊन त्यानुसार सुनावणीतील सर्व मुद्दे विचारात घेऊन उचित निर्णय घेण्यात येईल, असे शासकीय अभियोक्ता मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद यांच्यामार्फत मा.उच्च न्यायालयात म्हणणे सादर केले होते. सदर म्हणणे विचारात घेऊन मा.उच्च न्यायालयाने सदर याचिका निकाली काढली. त्यानुसार परभणी जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत प्रकरणातील संबंधितांना म्हणणे सादर करण्याची संधी देऊन सुनावणीची प्रक्रिया पूर्ण करून जिल्हाधिकारी, परभणी यांनी दिनांक ३०/३/२०१७ रोजी आदेश निर्गमित केलेले आहेत. सादर आदेशानुसार वादातीत जमिनीबाबत जिल्हाधिकारी कार्यालयाचे दिनांक २२/१/२०१६ रोजीचे आदेश संपुष्टात आले आहेत. त्यामुळे सदर जमिनीवरील अतिक्रमण हटवून जागा ताब्यात घेण्याची कार्यवाही करण्यात आलेली नाही. सदर दिनांक ३०/३/२०१७ रोजीच्या आदेशाविरूध्द अप्पर आयुक्त, विभागीय कार्यालय, औरंगाबाद यांचे न्यायालयात अपील दाखल करण्यात आलेले असून ते प्रलंबित आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## विक्रमगड (जि.पालघर) येथील सार्वजनिक बांधकाम उपविभागांतर्गत निकृष्ट दर्जाची कामे करून गैरव्यवहार केल्याबाबत

**(२१) * ३११४९ श्रीमती विद्या चव्हाण, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.धनंजय मुंडे, श्रीमती हुस्नबानू खलिफे, ॲड.राहुल नार्वेकर** : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विक्रमगड (जि.पालघर) तालुक्यातील सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत निकृष्ट दर्जाची कामे करून गैरव्यवहार करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यासाठी सुशिक्षित बेरोजगार आदिवासी संघर्ष समितीने माहे मार्च, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान सार्वजनिक बांधकाम उपविभागाच्या कार्यालयासमोर बेमुदत उपोषण केले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सार्वजनिक बांधकाम उपविभागाने केलेल्या कामांमध्ये होत असलेला विलंब व दुर्लक्ष, अपूर्ण कामे, कामांमध्ये वापरण्यात येणारे निकृष्ट दर्जाचे साहित्य त्यामुळे निकृष्ट दर्जाची झालेली कामे त्यामध्ये झालेला गैरव्यवहार याबाबत संबंधित अधिकाऱ्यांची चौकशी करून कारवाई करण्याबाबतची मागणी संघर्ष समितीने केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने गैरव्यवहार करणाऱ्या संबंधित दोषी अधिकारी/कर्मचारी यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय, हे खरे आहे.
(२), (३) व (४) प्रश्नांकित बाबी बाबत अधिक्षक अभियंता, दक्षता व गुण नियंत्रण मंडळ, नवी मुंबई यांच्याकडून चौकशी करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

-----------------

## मेळघाट (जि.अमरावती) दुर्गम भागातील रस्त्यांची दुरवस्था झाल्याबाबत

**(२२) * ३२६६८ डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मेळघाट (जि.अमरावती) दुर्गम भागातील अंतर्गत रस्त्यांची दुरवस्था झाली असून अनेक पूल वाहून गेल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मेळघाटातील ३२० गावांपैकी २०३ गावांना डांबरी रस्त्याने जोडल्याची नोंद शासन दप्तरी असून प्रत्यक्षात सदर गावातील रस्ता हा दगड, मातीचा अशा अवस्थेत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, तीन वर्षापूर्वी अतिवृष्टीने वाहून गेलेल्या रस्त्याच्या दुरूस्तीकरीता शासनाकडून निधी मिळाला नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर रस्त्याची दुरूस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२) व (३) नाही. हे खरे नाही.
मेळघाट अंतर्गत धारणी व चिखलदरा तालुक्यात २०११ जनगणनेनुसार एकुण ३१५ गावे असुन त्यापैकी २३७ गावे डांबरी रस्त्याने जोडण्यात आलेली आहेत. तसेच सन २०१३-१४ मध्ये पुरहानी अंतर्गत मंजूर असलेली एकुण ५८ कामे पुर्ण झाली असुन रस्ते वाहतुकीस सुस्थितीत ठेवण्यात आले आहेत.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## समृध्दी सहकारी गृहनिर्माण संस्था (बोरिवली, मुंबई) यांना दिलेल्या जमिनीत शर्तभंग केल्याबाबत

**(२३) * ३४१६१ श्री.आनंद ठाकूर :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) प्लॉट नंबर ३९३, समृध्दी सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित बोरिवली (प.) या संस्थेला निवासी वापराकरीता १०.९५ चौ.मी. चा शासकीय भुखंड सन २००० मध्ये वा त्यादरम्यान शासनाने कब्जेहक्काने दिला होता, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर संस्थेने शर्तभंग केल्याप्रकरणी संस्थेविरुध्द जिल्हाधिकारी उपनगर यांच्या कार्यालयात संस्थेची साक्ष सुरु असून कोणत्या प्रकरणांवर शर्तभंग झाल्याबाबत संस्थेची साक्ष सुरु आहे,
(३) असल्यास, सदर भुखंडावर जाहिरात फलक लावण्यात येत असून त्याकरीता जिल्हाधिकारी उपनगर किंवा महसूल विभाग यांची परवानगी घेण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने भुखंड वापरासंदर्भात शर्तभंग करणाऱ्या संस्थेविरूध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२), (३) व (४) मौजे बोरिवली, टि.पी.एस. क्र. ३ स.नं. १३५, न.भू.क्र. ८२ पैकी अंतिम भूखंड क्र. ३९३ क्षेत्र १०९५.३ चौ.मी. भूखंड शासन ज्ञापन, महसूल व वन विभाग, दिनांक २२/०८/२००० अन्वये समृध्दी सहकारी गृहनिर्माण संस्थेस काही अटी/शर्तींवर निवासी प्रयोजनासाठी कब्जेहक्काने मंजूर केला आहे. सदर संस्थेने या जमिनीवर बांधलेल्या इमारतीच्या आवारात कुंपणालगत जिल्हाधिकाऱ्यांची/ शासनाची परवानगी न घेता जाहिरात फलक उभारण्यात येत असल्याची बाब निदर्शनास आली आहे. सदर शर्तभंगाबाबत समृध्दी सहकारी गृहनिर्माण संस्थेस नोटीस देण्याची व सुनावणीअंती नियमानुसार संस्थेविरूध्द योग्य ती कार्यवाही जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांचेमार्फत करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## औरंगाबाद जिल्ह्यातील घाटनांद्रा घाटाची दुरवस्था झाल्याबाबत

**(२४) * ३४४१२ श्री.सुभाष झांबड :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औरंगाबाद जिल्ह्यातील घाटनांद्रा घाटातील रस्त्यामध्ये पडलेल्या खड्यांमुळे रस्त्याची दुरवस्था झाली असून घाटातील वळण रस्त्यावर संरक्षण कठडे नसल्यामुळे वारंवार अपघात होत असल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने घाट रस्त्याची दुरूस्ती करण्याबाबत व संरक्षक कठडे बांधण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्य परिवहन महामंडळाचे खाजगीकरण करण्याबाबत

**(२५) * ३१३१५ श्री.संजय दत्त :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाने देशभरातील खाजगी भागीदारीतून प्रवाशी वाहतूक सुरु करण्याचा निर्णय घेतल्यामुळे देशभरातील २७ राज्य परिवहन महामंडळ बंद होण्याच्या मार्गावर असून महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ देखील बंद होण्याच्या मार्गावर आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्य परिवहन महामंडळ टाटा कन्सलटन्सी आणि रिलायन्स या कंपन्यांकडे खाजगी भागीदारीतून सोपविण्यात येणार असल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्‌नुसार राज्य परिवहन महामंडळाचे खाजगीकरण करण्याबाबत भुमिका स्पष्ट करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) नाही.
(२) नाही.

तथापि, दिनांक १४/०४/२०१७ रोजीच्या दैनिक "पुढारी" या वर्तमानपत्रामध्ये अशा आशयाचे वृत्त प्रसिध्द झाले आहे.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## रायगड जिल्ह्यात अवकाळी पावसामुळे नुकसानग्रस्तांना मदत देण्याबाबत

**(२६) * ३२४६८ श्री.जयंत पाटील, श्री.बाळाराम पाटील :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्यात अवकाळी पावसामुळे अनेक भागात घरांचे व आंब्याचे नुकसान दिनांक १२ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर नुकसानीचे संबंधित विभागाकडून पंचनामे करण्यात आले आहेत काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने नुकसानग्रस्तांना मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाचे कारण काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) होय.

अवकाळी पाऊस, वादळ यामुळे माहे मे, २०१७ मध्ये रायगड जिल्ह्यात ११७७ घरांचे अंशत: नुकसान झाले आहे. तर १७ गोठ्यांचे नुकसान झाले आहे. सदर आपत्तीमध्ये जिवीत व शेती/शेतीपिकांचे नुकसान झालेले नाही. घर/ गोठ्यांचे झालेल्या नुकसानीबाबत पंचनामे करुन आपद्‌ग्रस्तांना रुपये २,२४,५०१/- इतक्या आर्थिक मदतीचे वाटप करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मरडसगांव ते रोकडेवाडी (ता.पालम, जि.परभणी) या रस्त्याची दुरवस्था झाल्याबाबत

**(२७) * ३४२६० प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मरडसगांव ते रोकडेवाडी (ता.पालम, जि.परभणी) या रस्त्याचे काम जवळपास एक वर्षापासून प्रलंबित असून या रहदारीच्या रस्त्याची दुरवस्था झाल्याने रावराजूर, धनेवाडी, खुर्लेवाडी, सायाळा, नरळद, इरळद, गोपा, रोकडेवाडी या आठ गावांचे दैनंदिन प्रवास हा त्रासदायक व धोकादायक होत असून या ठिकाणी वारंवार अपघात होत असल्याची बाब माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कंत्राटदाराने शासकीय अधिकाऱ्यांच्या संगनमताने सदरहू रस्त्याचे काम पूर्ण न करता काम पूर्ण केल्याचे दर्शवून निधीचा अपहार केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कंत्राटदारावर व संबंधित अधिकारी यांच्यावर कारवाई करून रस्त्याची दुरूस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पूर्व द्रुतगती महामार्गावरील ठाणे आणि मुलुंड दरम्यान रेल्वे वरील पुलाची दुरवस्था झाल्याबाबत

**(२८) * ३३८११ श्री.रविंद्र फाटक :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पूर्व द्रुतगती महामार्गावरील ठाणे आणि मुलुंड दरम्यान रेल्वे लाईन वरील सन १९५८ साली सार्वजनिक बांधकाम विभागाकडून बांधण्यात आलेला पुल अपुरा व अतिशय धोकादायक स्थितीत असल्याने दिनांक १२ फेब्रुवारी, २००१ रोजी शासन निर्णयाद्वारे नविन पुल बांधण्यास शासकीय मान्यता देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त पुलाच्या बांधकामास विलंब होत असल्याने दिनांक १८ मार्च, २०१६ रोजी एक सदस्य समिती नेमण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर पुलावरून प्रतिदिन १ ते २ लाख वाहने जात असल्याने पूल केव्हाही कोसळून जिवित व वित्त हानी होण्याची शक्यता निर्माण झाल्यामुळे याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीनी मा.मुख्यमंत्री यांना माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर पुलाचे बांधकाम करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय.

(२) होय.

(३) याबाबतचे निवेदन मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे प्राप्त झाले आहे.

(४) प्रश्नांकित पुलाचे बांधकाम मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत हाती घेण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार या पुलाचे बांधकाम रेल्वेच्या सहमतीने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत हाती घेण्यासाठी प्रकल्प अहवाल तयार करून त्यास रेल्वेची मान्यता मिळवून निविदा बोलावण्याची कार्यवाही प्रगतीत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कोळंब (ता.मालवण, जि.सिंधुदुर्ग) पुलाची दुरवस्था झाल्याबाबत

**(२९) * ३४२३१ श्रीमती हुस्नबानू खलिफे : तारांकित प्रश्न क्रमांक २९१५७ ला दिनांक १७ मार्च, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोळंब (ता.मालवण, जि.सिंधुदुर्ग) पुलाची दुरवस्था झाली असून याबाबत संबंधित विभागाकडे स्थानिक ग्रामस्थांनी वारंवार निवेदन देऊनही अद्यापही सदर पुलाची दुरुस्ती केली नसल्याचे माहे जून, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पुलाची दुरुस्ती केली नसल्यामुळे येथील नागरीकांना तसेच वाहनांना या धोकादायक पुलावरून प्रवास करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर पुलाची दुरूस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) नाही.

प्रश्नांकित पुलाच्या दुरुस्तीचे काम मंजूर करण्यात आले आहे. कामासाठी निविदा प्रक्रिया प्रगतीत आहे.

(२) नाही,

पुलाच्या दुरुस्तीचे काम पूर्ण होईपर्यत सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून पुलावरुन अवजड वाहनांना वाहतूक करण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे. अवजड वाहनांची वाहतूक अन्य मार्गाने वळविण्यात आली आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांसाठी राबविल्या जाणाऱ्या उपाययोजनांमध्ये नाशिक विभागाचा समावेश करण्याबाबत

**(३०) * ३१२६२ डॉ.अपूर्व हिरे, श्री.जयवंतराव जाधव : तारांकित प्रश्न क्रमांक २७८२५ ला दिनांक १७ मार्च, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठीच्या उपाययोजनेंतर्गत कार्यरत कै.वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशन तसेच बळीराजा चेतना अभियान या उपक्रमाच्या कार्यक्षेत्राची व्याप्ती वाढवून त्यात इतर जिल्ह्यांचा अंतर्भाव करण्यासंबंधीची बाब तपासण्याची सुरु असलेली कार्यवाही पुर्ण झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नाशिक विभागातील फक्त नाशिक जिल्ह्यात दिनांक ०१/०१/२०१५ ते दिनांक १५/०५/२०१७ या कालावधीत २०६ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या असून माहे जून, २०१७ पर्यंत ५० शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर अभियान/उपक्रमामध्ये नाशिक विभागाचा समावेश करून नाशिक जिल्ह्यातील शेतकऱ्यांना आत्महत्याग्रस्त जिल्ह्यांसाठी देय असलेले लाभ देण्याबाबत तसेच, आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबियांच्या मदतीमध्ये वाढ करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) या कार्यक्रमांमध्ये इतर जिल्ह्यांचा समावेश करण्याबाबत तपासणी करण्याची कार्यवाही सुरू आहे.

(२) व (३) नाशिक जिल्ह्यात दिनांक १ जानेवारी, २०१५ ते दिनांक १५ मे, २०१७ पर्यंत एकूण २०६ व्यक्तींनी आत्महत्या केलेल्या आहेत. त्यापैकी १२३ प्रकरणे पात्र ठरलेली असून उर्वरित ८३ प्रकरणे अपात्र आहेत. दिनांक १ जानेवारी, २०१७ ते ३० जून, २०१७ पर्यंत एकूण ५३ व्यक्तींनी आत्महत्या केलेल्या आहेत. त्यापैकी ३३ प्रकरणे पात्र असून १८ प्रकरणे अपात्र आहेत व २ प्रकरणे चौकशीकरीता प्रलंबित आहेत.

शेतकरी आत्महत्या पात्र प्रकरणी आत्महत्याग्रस्तांच्या वारसास रुपये १.०० लाख इतके सानुग्रह अनुदान दिले आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी उस्मानाबाद व यवतमाळ या दोन जिल्ह्यांमध्ये पथदर्शी प्रकल्प राबविण्यात येत असून त्याअंतर्गत बळीराजा चेतना अभियान राबविण्यात येत आहे. नाशिक विभागातील जिल्ह्यांसह इतर विभागातील जिल्ह्यांचा समावेश करण्याबाबत तपासणी करण्यात येत आहे.

आत्महत्याग्रस्त कुटुंबियांच्या मदतीमध्ये वाढ करण्याबाबत कोणताही प्रस्ताव नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नागपूर जिल्हयात गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजनेतील प्रस्ताव प्रलंबित असल्याबाबत

**(३१) * ३४०९८ श्री.परिणय फुके :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना सुरक्षा कवच मिळावे, त्यांचे जीवन सुरक्षित व्हावे, त्यांच्या कुटुंबाला वेळीच मदत मिळावी या हेतूने राज्य शासनातर्फे शेतकऱ्यांसाठी गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजना राबविली जात आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागील सात वर्षात नागपूर जिल्ह्यातील एकूण ३५७ शेतकऱ्यांनी या अपघात विमा योजनेच्या लाभासाठी कृषी विभागाकडे प्रस्ताव सादर केले, परंतू आतापर्यंत त्यापैकी केवळ २१४ शेतकऱ्यांनाच या योजनेचा लाभ मिळाला असून तब्बल ८६ प्रस्ताव ना मंजूर करण्यात आले आहेत व ४३ प्रस्ताव अजूनही प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार शेतकऱ्यांचे विमा कंपनीकडे प्रलंबित असलेले प्रस्ताव निकाली काढण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर :** (१) राज्यातील सर्व शेतकऱ्यांकरिता सदर योजना राबविली जात आहे, हे खरे आहे.

(२) अपघात विमा योजनेंतर्गत सन २०१०-११ पासून २०१६-१७ पर्यंत नागपूर जिल्ह्यातील एकुण ५६९ विमा प्रस्ताव कृषी विभागाकडे प्राप्त झालेले आहेत. त्यापैकी ५६१ प्रस्ताव संबंधित विमा कंपन्याकडे सादर करण्यात आलेले आहेत. त्यापैकी ३७२ प्रस्ताव विमा कंपन्यांकडून मंजूर करण्यात आलेले आहेत व १४४ प्रस्ताव अटी व शर्तीत बसत नसल्याने नामंजूर करण्यात आले आहेत. ४५ प्रस्ताव विमा कंपनीकडे कार्यवाहीत आहेत तसेच ८ प्रस्ताव कागदपत्रांच्या पूर्ततेसाठी जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी यांचेकडे प्रलंबित आहेत.

(३) विमा कंपनीकडे प्रलंबित असलेल्या प्रस्तावांबाबत जिल्हा, विभाग, कृषी आयुक्तालय व राज्यस्तरावर नियमितपणे आढावा घेवून पाठपुरावा करण्यात येत आहे. प्रकरणांमधील त्रुटी दूर करण्यासाठी जिल्हास्तरावर विशेष कॅम्प घेण्यात येत आहेत. प्रलंबित असलेले प्रस्ताव निकाली काढण्याबाबत कंपनीस वेळोवेळी पत्र तसेच नोटीस देवून पाठपुरावा करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## यवतमाळ जिल्ह्यातील भुईमुग बियाणे सदोष असल्याबाबत

**(३२) * ३४११९ श्री.हरिसिंग राठोड, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्ह्यात ४० हजार हेक्टरवरील भुईमूगाचे बियाणे सदोष असल्याचे माहे मे-जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे झाडांना एकही शेंग न लागणे, कमी शेंग लागणे, शेंग परिपक्व न होणे अशा अनेक तक्रारी शेतकऱ्यांनी केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर :** (१) व (२) भुईमुग बियाणात भेसळ असल्यामुळे भुईमुग पिकाला शेंगा न लागणे, कमी शेंगा लागणे, शेंगा परिपक्व न होणे अशा प्रकारच्या तक्रारी यवतमाळ जिल्ह्यातील शेतकऱ्यांकडून मे-जून, २०१७ मध्ये प्राप्त झालेल्या आहेत, हे खरे आहे.
(३) उपविभागीय कृषी अधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील तालुका तक्रार निवारण समितीने संबंधित शेतकऱ्यांच्या शेतांना भेटी देऊन चौकशी केलेली आहे. तापमानात वाढ झाल्यामुळे पिकावर विपरीत परिणाम होऊन शेंगा विकसित होण्यास अडथळा निर्माण झाला, असा निष्कर्ष तक्रार निवारण समितीने नोंदविलेला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## आष्टी (ता.आष्टी, जि.बीड) बसस्थानकाची दुरवस्था झाल्याबाबत

**(३३) * ३३९३६ श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आष्टी (जि.बीड) बसस्थानक परिसरातील दुरवस्थेत असलेले रस्ते व पसरलेली अस्वच्छता त्यामुळे बसस्थानकाची दुरवस्था झाली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत स्थानिक नागरिकांनी आष्टी बसस्थानकातील रस्ते दुरूस्ती व स्वच्छतेचे काम करण्याबाबत शासनाकडे दिनांक १२ जून, २०१७ रोजी मागणी केली असून सदर कामे न केल्यास आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) व (२) नाही.

(३) राज्य परिवहन महामंडळाचे आष्टी बसस्थानक व स्थानकावरील वाहनतळ सुस्थितीत असून, बसस्थानकाची नियमित स्वच्छता करण्यात येत आहे. सदर बसस्थानकाचे नुतनीकरण/दर्जावाढ, प्रसाधनगृह बांधकाम इ. कामांच्या नकाशे व अंदाजपत्रक तयार करणेसाठी राज्य परिवहन पॅनेलवरील वास्तुविशारदाची नेमणूक करण्यात आली आहे. त्यांना बसस्थानकाची पाहणी करुन नकाशे व अंदाजपत्रके तयार करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मराठवाडयात नवीन महसूल आयुक्तालय स्थापन करणेबाबत

**(३४) * ३३८८६ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी : तारांकित प्रश्न क्रमांक २७८४१ ला दिनांक १० मार्च, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाडयात नवीन महसूल आयुक्तालय स्थापन करण्याबाबत डॉ.दांगट समितीने आपला अहवाल सन २०१६ मध्ये वा त्यादरम्यान शासनाकडे सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या अहवालात सादर करण्यात आलेल्या मुद्यांची थोडक्यात माहिती काय आहे,

(३) असल्यास, नवीन आयुक्तालय स्थापन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केलेली आहे, किती मुदतीत नवीन आयुक्तालयांची स्थापना करण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांचे अध्यक्षतेखाली नेमलेल्या एक सदस्यीय अभ्यासगटाने दिनांक ३०/१२/२०१६ रोजी अहवाल शासनास सादर केला आहे.

(२) नवीन महसूल आयुक्तालय स्थापन करण्याच्या अनुषंगाने भौगोलिक स्थान, लोकसंख्या, उपलब्ध पायाभूत सुविधा इ. मुद्दे विचारात घेऊन सदर अहवाल सादर करण्यात आला आहे.

(३) प्राप्त अहवालातील शिफारसींच्या अनुषंगाने वित्त विभाग व अन्य संबंधित विभागांचे अभिप्राय घेऊन मंत्रीमंडळाच्या मान्यतेने उचित निर्णय घेण्याचे संकल्पित आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मौजे देवणी बु. (जि.लातूर) येथील गरजू बेघर विस्थापित महिला कुटुंबांना घरासाठी जागेचे प्लॉट नावे करण्याबाबत

**(३५) * ३१०२३ श्रीमती विद्या चव्हाण, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.धनंजय मुंडे, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.जयवंतराव जाधव, श्रीमती हुस्नबानू खलिफे : तारांकित प्रश्न क्रमांक २५७२८ ला दिनांक १५ डिसेंबर, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** : सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे देवणी बु. (जि.लातूर) येथील गावठाण विस्तार वाढीसाठी संपादन करण्यात आलेली सर्वे नं. २३८/१ जमिनीतील प्लॉट गरजू गरीब लाभार्थ्यांना वाटप करण्याबाबत मा.महसूल मंत्री तसेच मा.कामगार, भूकंप पुनर्वसन मंत्री तथा पालकमंत्री, लातूर यांच्याकडे समर्थन या संस्थेने दिनांक ३१ मार्च, २०१७ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दिनांक २९ मार्च, २०१७ रोजी गरजू लाभार्थ्यांना लॉटरी पध्दतीने त्यांच्या नावे प्लॉट वितरीत झाले असताना दिनांक ३० मार्च, २०१७ पर्यंत त्या भूखंडाची रक्कम त्वरित जमा करण्याचे आदेश देण्यात आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, गरीब लाभार्थ्यांकडून भूखंडाची रक्कम न भरल्यामुळे नगरपंचायत, देवणी यांच्यामार्फत पंतप्रधान आवास योजना किंवा तत्सम योजनेतून घरकूल बांधण्याचा प्रस्ताव असल्याचे सांगण्यात येऊन तहसिलदार, देवणी, जि.लातूर यांनी सदरच्या आदेशावरून स्थगितीचे आदेश देण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर जमिनीचे प्लॉट वाटप करून त्यांच्या नावे करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे ही खरे आहे.
(३) एकूण पात्र ८७ लाभार्थ्यांपैकी फक्त ६ लाभार्थ्यांनी भोगवटा मुल्याची रक्कम जमा केली आहे. यादीतील बहुतांश लाभार्थी हे आर्थिकदृष्टया दुर्बल असल्याने भूखंड वाटपानंतर त्यावर स्वत:चे घर बांधण्याची त्यांची परिस्थिती नाही. ही बाब विचारात घेऊन सदर जागा नगर पंचायत देवणी यांच्याकडे वर्ग करुन त्यांच्यामार्फत पंतप्रधान आवास योजना किंवा तत्सम योजनेतून घरकुल बांधण्याच्या दृष्टीकोनातून मा.मंत्री (कौशल्य विकास व उद्योजकता, कामगार, भूकंप पुनर्वसन व माजी सैनिकांचे कल्याण) तथा पालकमंत्री लातूर यांनी दिनांक २९/३/२०१७ च्या पत्रान्वये भूखंड वाटपाच्या प्रक्रियेस पुढील आदेश होईपर्यंत स्थगिती दिली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जव्हार-चालतवाड-सेलवास या रस्त्यांची दुरवस्था झाल्याबाबत

**(३६) * ३४२१० श्री.आनंद ठाकूर :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जव्हार-चालतवाड-सेलवास (जि.पालघर) या मार्गावरील रस्त्यांचे नुतनीकरण करण्याऐवजी सदर रस्त्यावरील खड्डे भरून दुरूस्ती करून संबंधित ठेकेदार व अधिकारी यांच्या संगनमताने गैरव्यवहार केल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने गैरव्यवहार करणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## औरंगाबाद येथे बीड बायपासवरील देवळाई चौकात मल्टीट्रॅफिक कंट्रोल उड्डाणपुल बांधण्याबाबत

**(३७) * ३४४१८ श्री.सुभाष झांबड :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औरंगाबाद येथे बीड बायपासवरील देवळाई चौकात मल्टीट्रॅफिक कंट्रोल उड्डाणपुल रुंदीकरण प्रकल्पाच्या डीपीआरला मंजूरी देण्यात आल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर उड्डाणपुलासाठी शासनाने किती निधीची तरतूद केली आहे, पुलाचे काम कधीपासून सुरु करण्यात येणार आहे,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर पुलाचे काम पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.

तथापि, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणामार्फत मुकुंदवाडी, देवळाई चौक येथे रेल्वे उड्डाणपूलाच्या बांधकामासह जालना रोड व बीड बायपास रस्त्याची सुधारणा करण्यासाठी रुपये ७८४.१७ कोटी रकमेचा सविस्तर प्रकल्प अहवाल त्यांचे नवी दिल्ली येथील मुख्यालयास दिनांक ३१ मार्च, २०१७ रोजी सादर केला असून त्यास मंजुरी अप्राप्त असल्याचे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, औरंगाबाद यांनी कळविले आहे.

(२) सदरील प्रकल्प केंद्र शासनामार्फत राबविला जात आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## महाड (जि.रायगड) येथील सावित्री नदीचा पुल दुर्घटनेतील दोषींवर कारवाई करण्याबाबत

**(३८) * ३१३२२ श्री.संजय दत्त : तारांकित प्रश्न क्रमांक २३५३३ ला दिनांक ८ डिसेंबर, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाड (जि.रायगड) येथील सावित्री नदीचा पुल कोसळून नऊ महिने होऊनही सदर दुर्घटनेची चौकशी पूर्ण झालेली नसल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर दुर्घटनेच्या चौकशीसाठी निवृत्त न्यायाधिश न्यायमूर्ती एस.के.शहा यांची नेमणूक करण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या आयोगाची चौकशी पूर्ण झाली आहे काय, चौकशी अहवालानुसार संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) सदर चौकशी आयोगास दिनांक ३०/०८/२०१७ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली असून शासनास चौकशी अहवाल अद्याप अप्राप्त आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## रायगड जिल्हयात खारभूमी योजनांना मान्यता देणेबाबत

**(३९) * ३२४७८ श्री.जयंत पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक २८१०९ ला दिनांक १० मार्च, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **खारभूमी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्हयातील खाडीलगत असलेल्या भातपिकाखालील खारजमिनी मोठ्या प्रमाणावर बाधित होत असल्यामुळे नापिक झालेल्या जमिनी पुर्णलागवडीखाली आणण्यासाठी खारभूमी योजनांना मान्यता देवून निधी उपलब्ध करून देण्याबाबत शेतकऱ्यांनी शासनाकडे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने रायगड जिल्हयातील खार जमिनी लगत असलेल्या बांधबंदिस्तीसाठी निधी उपलब्ध करून प्रस्तावित योजनांना तसेच दुरूस्तींना मान्यता देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) होय.

(२) रायगड जिल्हयातील गोफाण, मुरुड आंबोली, साई, वढाव बोर्झे व जुई धमकडी या ५ खारभूमी योजनांच्या नुतनीकरणाचे कामास प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे. त्यापैकी गोफाण योजनेची निविदा प्रकिया प्रगतीपथावर असून, उर्वरित योजनांना तांत्रिक मान्यता घेण्याची प्रक्रिया प्रगतीपथावर आहे.

मौजे माणकुळे सोनकोठा व हाशिवरे येथील प्रस्तावित खारभूमी योजना असून प्रशासकीय मान्यतेच्या प्रक्रियेत आहेत.

रायगड जिल्हयातील खारभूमी योजनांकरीता सन २०१७-१८ मध्ये मुळ बांधकामांतर्गत रुपये ५७२.३६ लक्ष तरतूद आहे. यापैकी गोफाण योजनेच्या कामासाठी रुपये ६०.०० लक्ष अर्थसंकल्पिय तरतूद आहे. उपलब्ध तरतुदीतून नुतनीकरणाची कामे करण्यात येणार आहेत.

रायगड जिल्ह्यातील खारभूमी योजनांकरिता सन २०१७-१८ मध्ये वाढ व विस्तार अंतर्गत रुपये ३६८.२१ लक्ष व परिरक्षण व दुरुस्ती अंतर्गत रुपये १३३.४० लक्ष ची अर्थसंकल्पिय तरतूद असून १० वर्षापासून पूर्ण झालेल्या व दुरुस्ती आवश्यक असलेल्या योजनांची यातून सुधारणा व दुरुस्ती करण्यात येणार आहे.

रायगड जिल्ह्यातील नारवेल बेनवले, माणकुळे, जांभुळटेप व सोनखार उर्णोली या योजनांची तातडीची दुरुस्ती यांत्रिकी विभागामार्फत करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## रेवदंडा (ता.अलिबाग, जि.रायगड) येथील साळाव पुलाला धोका निर्माण झाल्याबाबत

**(४०) * ३४१९५ श्री.रविंद्र फाटक :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रेवदंडा (ता.अलिबाग, जि.रायगड) येथील साळाव पुल हा तीस वर्षे जुना असून सदर पुलाखाली रेती उत्खनन होत असल्यामुळे पुलाखाली खड्डे पडून पुलाला धोका निर्माण झाल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत स्थानिक नागरिकांनी शासनाकडे तक्रारी केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्‌नुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) नाही.

तथापि, पुलाच्या दोन गाळ्यामध्ये असलेल्या स्लॅबमधील प्रसरण सांधा (Expansion joint) क्षतिग्रस्त झाला होता. तो आता दुरुस्त करण्यात आला आहे. पुलाचे सविस्तर सर्वेक्षण व सर्वसमावेशक तपासणी करण्याचे काम निविदास्तरावर आहे.

(३) व (४) पुलाच्या प्रसरण सांध्याची (Expansion joint) दुरुस्ती करण्यात आली आहे. पुलाचे सविस्तर सर्वेक्षण व सर्वसमावेशक तपासणी करुन प्राप्त होणाऱ्या अहवालातील निष्कर्षानुसार कार्यवाही करण्याचे नियोजन आहे.

पुलाच्या लगत रेती उत्खनन झाले नसल्याचे जिल्हाधिकारी, रायगड यांनी प्रमाणित केले आहे. तसेच रेती उत्खनन होऊ नये यासाठी महसूल व पोलीस यंत्रणेस सतर्क राहण्याच्या सूचना जिल्हाधिकारी, रायगड यांनी दिल्या आहे. पुल वाहतुकीस सुरक्षित आहे.

-----------------

## सांगवी (ता.सडक-अर्जूनी, जि.भंडारा) येथे भटूटोला मार्गावरील पुलाचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत

**(४१) * ३३४०६ श्री.परिणय फुके :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगवी (ता.सडक-अर्जूनी, जि.भंडारा) येथे भटूटोला मार्गावर वाहतुकीकरीता पुलाचे बांधकाम सुरु असून त्यासाठी सिमेंट कॉंक्रीटवर (क्युरींग) मुबलक प्रमाणात पाणी ओतणे आवश्यक असताना क्युरिंगवर पाणी अल्प प्रमाणात देण्यात येत असल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू पुलास अपुरे पाणी दिल्यामुळे पुलाचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे होऊन पुलाचे गुणवत्तेवर विपरीत परिणाम होत असल्याबाबची तक्रार स्थानिक गावकऱ्यांनी संबधित अभियंत्याला दिली आहे, तसेच यामुळे भविष्यात मोठा अपघात होण्याचा धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मानेगांव (ता.जळगाव-जामोद, जि.बुलढाणा) येथील जमीन प्रकरणी शेतकऱ्यांना न्याय देण्याबाबत

**(४२) * ३१०२२ श्रीमती विद्या चव्हाण, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.धनंजय मुंडे, ॲड.राहुल नार्वेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती हुस्नबानू खलिफे : तारांकित प्रश्न क्रमांक २७२९३ ला दिनांक २४ मार्च, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मानेगांव (ता.जळगाव-जामोद, जि.बुलढाणा) येथील न्यायप्रविष्ठ असलेल्या गट नं. ३६, ३५२, ३५९ या जमिनीबाबत शासकीय महसूल अधिकाऱ्यांनी खोटी माहिती दिल्याप्रकरणी अखिल भारतीय लोकतंत्र सेनानी संघ यांनी मा.महसूल मंत्री व मा.पालक मंत्री (बुलढाणा) यांना दिनांक १० एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासकीय महसूल अधिकाऱ्यांच्या संगनमताने मौजे मानेगाव, ता.जळगाव-जामोद येथील गट नं. ३६, ३५२, ३५९ या जमिनीतील अवैधरित्या शेकडो ब्रास माती चोरून विकल्याबाबत व झाडे-रोपे नष्ट केल्याबाबतच्या प्रकरणी उपविभागीय अधिकारी, जळगांव जामोद यांना सखोल चौकशी करण्याबाबत जिल्हाधिकारी, बुलढाणा यांनी आदेश दिले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, उक्त चौकशीचा अहवाल शासनास सादर केला आहे काय, प्राप्त अहवालानुसार संबंधित अधिकाऱ्यावर कारवाई करण्याबाबत तसेच, जमिनीच्या मालकी हक्काबाबत शेतकऱ्यांना न्याय देण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२), (३) व (४) जिल्हाध्यक्ष, अखिल भारतीय लोकतंत्र सेनानी संघ, बुलढाणा यांनी मौजे मानेगांव (ता.जळगांव जामोद, जि.बुलढाणा) येथील गट नं. ३६, ३५२, ३५९ या जमिनीबाबत शासकीय महसूल अधिकाऱ्यांनी खोटी माहिती दिल्या प्रकरणी मा.मंत्री (महसूल) यांना दिनांक १० एप्रिल, २०१७ रोजी लेखी निवेदन दिले होते. सदर निवेदनाच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, बुलढाणा यांनी उपविभागीय अधिकारी, जळगांव जामोद यांना सखोल चौकशी करण्याचे आदेश दिले होते. उपविभागीय अधिकारी, जळगांव जामोद यांनी सादर केलेल्या चौकशी अहवालात उक्त निवेदनातील तक्रारीमध्ये तथ्य आढळून आले नसल्याचे नमूद केले आहे. तसेच यापूर्वी विभागीय आयुक्त, अमरावती विभाग, अमरावती यांच्या आदेशानुसार अपर जिल्हाधिकारी, बुलढाणा, उपविभागीय अधिकारी, दर्यापूर, व तहसिलदार, दर्यापूर यांच्या संयुक्त समितीने सादर केलेल्या अहवालामध्ये प्रश्नाधिन जमीन खाजगी मालकीची नसून शासकीय मालकीची असल्याचा निष्कर्ष काढण्यात आलेला आहे.

-----------------

## जव्हार-मलवाडा-वाडा (जि.पालघर) या रस्त्याच्या बांधकामात गैरव्यवहार झाल्याबाबत

**(४३) * ३४२११ श्री.आनंद ठाकूर :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जव्हार-मलवाडा-वाडा (जि.पालघर) या रस्त्यावरील खड्डे भरुन, पॅच बांधून रस्त्याचे बांधकाम करण्यात आल्याचे दाखवून गैरव्यवहार झाल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन गैरव्यवहार करणाऱ्या संबंधित अधिकारी व ठेकेदारांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येणार आहे,

(३) तसेच सदर रस्त्यांची साईडपट्टी भरण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**उत्तमसिंग चव्हाण**
**सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.